FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154177

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. १८, वर्ष Year २०२२, दिनांक Date २८/०३/२२

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि.१९८८ कलमे Sections ७

(ii) अधिनियम Act ..............., कलमे Sections ...............

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...............

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from २८/०३/२२ वेळ Time १६:००, तारीख पर्यंत Date to २८/०३/२२ वेळ Time १८:००

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २८/०३/२०२२, वेळ Time १६:००

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४० तारीख Date २८/०३/२२ वेळ Time २२:२०

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..............., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बृहन्मुंबई महानगरपालिका (बाजार विभाग) ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place संत गाडगे महाराज मंडई, सी सी एस क्र ३८८, माझगाव डिव्हिजन, नामदेव उसाजी भालेराव मार्ग, भायखळा (पूर्व) मुंबई २७ गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..............., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
In case, outside the limit of this Police Station

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name मेहबुब आलम शेख (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name गयासुद्दीन शेख

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ८००४२६७६०६

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..............., दिल्याचा दिनांक Date of Issue ..............., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..............., (f) व्यवसाय Occupation फळविक्रेता

(g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ..............., जनजात Sub-Caste ...............

(h) पत्ता Address रुम नं. ३८, टायटॅनिक बिल्डिंग ९, [illegible] आवळा कसाईवाडा, कुर्ला (पूर्व) मुंबई ४०००७० गल्ली / सर्व्हे नं. Ward ..., घर / नाव नं. House/Name No. ..., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..., पॅन नं. PAN No. ..., वोटर्स नं. Card No. ...

रस्त्याचे नाव Road ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...

तालुका Taluka ..............., जिल्हा Dist. ..............., राज्य State ..............., सध्याचा पत्ता Present Address ...............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

श्री निलेश काशिनाथ कोळी, वय ५० वर्षे, धंदा नोकरी, शिपाई बृहन्मुंबई महानगरपालिका बाजार विभाग, भायखळा मुंबई) नेमणूक- सीसीएस क्र ३८८ माझगाव डिव्हिजन नामदेव उसाजी भालेराव मार्ग भायखळा (पू) मुंबई, रा. रुम नं २०३, दुसरा माळा, नुतन मानस बिल्डिंग, सेक्टर १२ सी, बालआश्रमसमोर, वनकोडे, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

Y.P.R.-800 Reg.-(25×6-150 Bks.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी मेहबुब आलम गमालुद्दीन शेख वय ५० वर्षे राहणार रूम नं २९, टायटॅनिक बिल्डिंग, पहिला मजला, कसाई वाडा, कुर्ला (पूर्व) मुंबई-७० यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेली फिर्याद हीच गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(विक्रम पवार)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
वरळी, मुंबई.

मेहबुब आलम

(मेहबुब आलम गमालुद्दीन शेख)

फिर्यादी दिनांक २९/०३/२०२२

श्री. मेहबुब आलम गयासुद्दीन शेख, वय ५० वर्षे, धंदा— फळविक्री रा.ठि. रूम नं २९ टायटॅनिक बिल्डिंग, १ ला मजला कसाई वाडा कुर्ला पूर्व. मुंबई. ४०००७०. मो.क्र ९००४२७१६०६.

..........

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी मागील १४ वर्षापासुन माझ्या कुटुंबासमवेत रहावयास आहे. मी संत गाडगे महाराज महानगरपालिका मंडई, भायखळा, मुंबई. ४०००२७. येथे गाळा क. एफ/६३(२) येथे गेल्या ०७ वर्षापासून काम करीत आहे. सदरचा गाळा हा श्रीम. फरिदा कुरेशी यांचा आहे. त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

दरवर्षी माहे मार्च महिन्यात मंडईतील गाळयांचे लायसन्सचे नूतनीकरण आणि भाडेशुल्क तसेच नोकरनामा तयार केला जातो सदरचे काम मंडई कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी करतात. मंडईचे कार्यालय मंडईतच असून श्री आनंद शिंदे हे मंडई निरीक्षक आहेत. श्री निलेश कोळी हे शिपाई आहेत तसेच या व्यतिरिक्त इतर कर्मचारी मंडई कार्यालयात आहेत. मंडई कार्यालयात नोकरनामा तयार करण्याकरीता शासकीय फी रूपये १४८०/— व्यतिरिक्त कोणाकडून ज्यादा १०००/— रूपये तर कोणाकडून ५००, तर कोणाकडून १५००/— रूपये घेतले जातात. सदर रक्कम मंडई निरीक्षक श्री आनंद शिंदे आणि मंडईतील संघटना (एकता असोशिएशन) चे सचिव श्री बाळू हरपळे यांचे सांगण्यावरून मंडईतील शिपाई श्री निलेश कोळी घेतात. सदर कायदेशीर फी व्यतिरिक्त घेतलेली ज्यादा रक्कम नंतर आपापसात वाटली जाते.

मी काम करीत असलेल्या गाळा क्र. एफ/६३(२) चा नोकरनामा तयार करण्याकरीता तीन ते चार वेळा मंडई कार्यालयात गेलो असता शिपाई श्री निलेश कोळी यांनी माझ्याकडून नोकर नाम्याकरिता शासकीय १४८०/फी व्यतिरिक्त १०२० अशी ज्यादा म्हणजे एकूण २५००/— रूपये ची मागणी केली. श्री निलेश कोळी हे माझ्याकडून लाचेच्या रकमेची मागणी करीत आहेत परंतू मला श्री निलेश कोळी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दिनांक २८/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्याकरीता आलो. तेथे आल्यानंतर माझी तक्रार वरिष्ठांना सांगितली व वरिष्ठांनी पो.नि. विक्रम पवार यांना बोलावून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पो.नि. विक्रम पवार हे मला एका कक्षात घेवुन गेले. पो.नि. विक्रम पवार यांनी त्यांचे केबिनमध्ये उपस्थित असलेल्या एका महिलेची ओळख पोलीस निरीक्षक, प्रतिक्षा भगत अशी मला करून दिली व त्या माझ्या तक्रारीचे कारवाई दरम्यान देखरेख अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगितले. पो.नि. विक्रम पवार यांनी माझे तक्रारीबाबत विचारपुस करून मला माझी तक्रार लेखी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मला हिंदी व मराठी लिहीता येत नसल्याने माझ्या गाळयाचे मालक श्रीम. फरिदा कुरेशी यांनी मी सांगितलेली तक्रार मराठीतून लिहून हिंदीतून समजावून सांगितली. माझे सागण्यावरुन तक्रार अर्ज तयार केला व त्याखाली मी माझी स्वाक्षरी केली. नमुद तक्रारीमध्ये श्री निलेश कोळी यांनी कायदेशीर रूपये १४८०/— फी व्यतिरिक्त रूपये १०२०/— लाच मागितली असून त्यावर कारवाई होणेकरिता लेखी तक्रार अर्ज पो.नि. विक्रम पवार यांचेकडे दिला.

Scanned with OKEN Scanner

आज दि. २९/०३/२०२२ रोजी पो.नि. विक्रम पवार यांनी लाचलुचपत प्रति कार्यालयात आवश्यक कारवाई पुर्ण करून माझी तक्रार अर्ज पुन्हा पंचासमक्ष वाचुन त्यावर पंचा व पोनि विक्रम पवार यांच्या सहया घेतल्या त्यानंतर माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरिता मी, पंच व पोलीस पथक असे दोन पोलीस वाहनातून लोकसेवक यांचे कार्यरत ठिकाणी संत गाडगे महाराज महानगरपालिका मंडई येथे जाणेकरिता पथकासह रवाना झालो. आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथून मनपा शाळा एस ब्रिज जवळ येथे आल्यावर पो.नि. विक्रम पवार यांचे सांगण्यावरून वाहन चालकास वाहन कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबविण्यास सांगितले.

त्यांनतर मला शर्टाच्या आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे सोबत पंच श्री. राजू बोडके यांचेसह लोकसेवक निलेश कोळी यांना भेटण्याकरीता संत गाडगे महाराज महानगरपालिका मंडई येथे त्यांच्या कार्यालयात गेलो असता, तेथे लोकसेवक श्री निलेश कोळी यांची भेट झाली. मी लोकसेवक श्री निलेश कोळी यांच्याशी चर्चा करीत असतेवेळी लोकसेवक कोळी यांनी मला **" माझा नोकरनामा तयार करण्याकरीता शासकीय फी १४८०/– व्यतिरीक्त ५२०/– स्वत:साठी लाच असे एकूण रु.२,००० रक्कमेची मागणी करुन त्वरीत स्विकारण्याची तयारी दाखवली."** सदरची रक्कम ही मी लगेच घेवून येतो असे सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले आहे.

पडताळणीच्या वेळी झालेल्या संभाषणाची हकीगत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक श्री निलेश कोळी यांनी पडताळणीमध्ये फी ची रक्कम रू. १४८०/– व रू. ५२०/– रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने व लोकसेवक श्री. निलेश कोळी यांनी लाचेची रक्कम दहा मिनीटामध्ये आणुन देण्यास सांगितल्याने त्वरीत सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि विक्रम पवार यांनी सांगितले. मी लाच देण्याकरिता रक्कम सोबत आणली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी नोकरनाम्या करीता लागणारी फी व लाचेकरीता लागणारी रक्कम मी माझे बचतीमधुन आणली असल्याचे पो.नि. पवार यांना सांगितले. माझे बचतीतील रूपये २०००/– रक्कम (रू. ५००/– दराच्या ४ भारतीय चलनी नोटा) पो.नि. विक्रम पवार यांचे समक्ष सादर केल्या. त्यांनी सापळा पथकातील अंमलदारा मार्फत माझी अंगझडती घेतली व मी लाच म्हणून देण्याकरिता आणलेली रक्कम रू. २,०००/– वगळून अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या इतर चीजवस्तू व रक्कम मला परत केली व ती पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवण्यास सांगितली.

त्यानंतर पो.नि. विक्रम पवार यांनी मला व पंचांना लाचेकरिता दयावयाचे रक्कमेस ॲथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही आलेल्या पोलीस वाहनाचे चालक श्री. शिवथरे यांना बोलावून मला व पंचांना ॲथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगून प्रात्यक्षिक सापळा कारवाई नंतर दाखविण्यात येणार असल्याचे मला व पंचाना सांगितले. त्यावेळी त्यांनी गाडीत असलेल्या पेटीतून एक डब्बा बाहेर काढून ॲथ्रासीन पावडरचे गुणधर्म मला पंचांसमक्ष समजावुन सांगितले. त्यानंतर लोकसेवक निलेश कोळी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर इशारा म्हणुन माझे केसावरून हात फिरवण्याचा इशारा करण्यासा सांगितला. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस

Scanned with OKEN Scanner

रंगेहात पकडतील असे सांगितले व सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेच्या आवश्यक त्या सुचना मला व पंच श्री. बोडके यांना दिल्या.

त्यानंतर पोलीस वाहनात वाहन चालक श्री. शिवथरे यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावुन सदरची रक्कम माझे शर्टच्या खिशामध्ये अलगद ठेवली. पो.नि. विक्रम पवार यांनी यापुढील कारवाईत श्री. शिवथरे सहभागी असणार नाहीत असे मला व पंचांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. विक्रम पवार यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. राजू बोडके यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक कार्यरत असलेल्या संत गाडगे महाराज महानगरपालिका मंडई येथील कार्यालय याठिकाणी मी व पंच श्री बोडके यांचेसह पायी रवाना झालो.

माझे पाठोपाठ पोलीस पथक देखील पायी येवुन काही अंतर थांबले. त्यानंतर मी व पंच बोडके असे लोकसेवक काम करत असलेल्या ठिकाणी नोकरनामा बनविण्यासाठी गेलो. त्यावेळी लोकसेवक श्री निलेश कोळी यांनी फीचे १४८०/– रूपये व बाकीचे ५२०/– त्याच्या स्वत:साठी लाच असे घेवून येण्यास सांगितल्याने मी माझे शर्टच्या खिश्यातील फी चे १४८०/– व लाचेची रक्कम रूपये ५२०/– असे एकूण रूपये एकूण रु.२०००/– लाचेची रक्कम बाहेर काढुन लोकसेवक यांचे समोर केली असता, त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या शर्टच्या खिश्यात ठेवली. त्यावर मी लागलीच सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा म्हणुन माझे केसावरून हात फिरवून पथकास इशारा केला. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लोकसेवक श्री निलेश कोळी यांस लाच स्विकारताना रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. पवार यांनी माझे शर्टास लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन स्वत:च्या ताब्यात घेतला.

त्यानंतर हात तपासण्याची व इतर प्राथमिक कारवाई लोकसेवक यांचे कार्यालयातच पूर्ण करण्यात आली. सदर कार्यालयात पुढील कारवाई करण्याकरिता आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे जावून करण्यात येणार असल्याचे पो.नि.विक्रम पवार यांनी सांगितले. त्यानुसार मी, पंच, लोकसेवक श्री निलेश कोळी यांचे सह लाचलुचपत कार्यालयात आलो व पुढील कारवाई करण्यात आली.

कार्यालयात आलेवर पोनि विक्रम पवार यांनी पंचांसमक्ष वर नमुद लोकसेवक यांना त्यांचे पुर्ण नाव व पद बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नावे श्री. निलेश काशिनाथ कोळी, वय ५० वर्षे, व्यवसाय – नोकरी (शिपाई बृहन्मुंबई महानगरपालिका बाजार समिती, भायखळा मुंबई.) राठि– रूम नं २०३, दुसरा माळा नुतन मानस बिल्डिंग सेक्टर १२ सी बालाश्रम समोर, बनकोडे कोपरखैराणे नवी मुंबई. ४००७०९. असे सांगितले.

मी काम करीत असलेल्या गाळा क्र. एफ/६३(२) चा नोकरनामा बनविण्याकरीता तीन ते चार वेळा मंडई कार्यालयात गेलो असता शिपाई श्री निलेश कोळी यांनी माझ्याकडून नोकर नाम्याकरिता शासकीय फी १४८०/– रूपये सह स्वत: करीता १०२०/– लाच म्हणजे एकूण २५००/– रूपये ची मागणी करुन तडजोडीअंती शासकीय फी १४८०/– रूपये सह स्वत:

Scanned with OKEN Scanner

करीता ५२०/- रू. लाच अशी एकूण २,०००/- इतक्या रकमेची मागणी करून माझेकडून स्विकारली म्हणुन माझी श्री निलेश कोळी यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. लोकसेवक श्री निलेश कोळी यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला हिंदीतुन समजावुन सांगीतली असता ती माझे सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( विक्रम पवार )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी कॉलम क्र ०७ मधील आरोपीत इसमाने यांच्या गाळा क्र एल/६३(२) चा भाडेकरनामा बनविण्याकरीता मंडई निरीक्षक ई वार्ड मनपा, भायखळा कार्यालयातील आलोसे श्री. निलेश कोळी यांनी शासकीय फी रु.१४८०/- रक्कम सह स्वतःकरीता रु ५२०/- रक्कम लाच अशी एकुण २०००/- इतक्या रक्कमेची मागणी करून ती स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा कलम ७ भ्रप्रअधि १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. विक्रम शिवाजी पवार ला.प्र.वि मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name विक्रम शिवाजी पवार
पदनाम Rank पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. मुंबई.
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner